**चित्रपट - नाना पाटेकर**

एक अत्यंत सर्जनशील कलावंत आणि रसिकांच्या मनातील 'नटसम्राट' म्हणून नाना पाटेकर यांनी हिंदी, मराठी चित्रपट सृष्टी आणि नाट्यसृष्टीत स्वत:चं असं एक वेगळं आस्तित्त्व उभं केलं आहे. जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मधून रंग-रेषांशी संवाद साधत नानांनी रंगमंच आणि चित्रपटात पदार्पण केलं.

१९७८ मधील गमन या चित्रपटापासून ते २०१६ च्या 'नटसम्राट' पर्यंत प्रत्येक चित्रपटातून नाना पाटेकर यांनी प्रत्येक भूमिका उंचीवर नेली आणि संवाद बोलण्याची आपली विशिष्ट शैलीही लोकप्रिय केली. परिंदा मधील खलनायक, तिरंगा मधील राजकुमार यांच्या तोडीस तोड केलेला अभिनय 'पुरुष' नाटकातील गुलाबराव, हमिदाबाईची कोठी मधील 'सत्तार' या भूमिका आणि नटसम्राट मधील 'गणपतराव बेलवलकर' या भूमिका त्यांच्यातील सृजनशील आणि चतूरस्त्र अभिनेत्याची साक्ष देतात.

परिंदा, अंगार, क्रांतीवीर, अपहरण साठी चार फिल्मफेअर पूरस्कार, क्रांतीवीरसाठी राष्ट्रीय पूरस्कार, दोन वेळा स्टार स्क्रिन पुरस्कार, पद्मश्री अशी त्यांच्या मिळालेल्या पूरस्कारांची मोठी यादी आहे. सामाजिक कार्यातही मोठा सहभाग असून महाराष्ट्रातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबियांना आर्थिक आणि मानसिक आधार देण्यासाठी त्यांनी अभिनेते मकरंद अनासपूरे यांच्याबरोबर 'नाम फाऊंडेशनची' स्थापना केली असून या संस्थेचे मोठे काम चालू आहे.